**पहिला भारत-मलेशिया सुरक्षा संवाद**

07 जानेवारी, 2025

पंतप्रधानांचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार श्री. अजित डोवाल आणि मलेशियाच्या राष्ट्रीय सुरक्षा परिषदेचे महासंचालक राजा दातो नुशिरवान बिन झैनल अबिदिन यांच्या सह-अध्यक्षतेखाली पहिला भारत-मलेशिया सुरक्षा संवाद हा नवी दिल्ली येथे 07 जानेवारी 2025 रोजी पार पडला.

2. सुरक्षा संवाद दरम्यान उभय पक्षांनी जागतिक व प्रादेशिक सुरक्षा परिस्थितीबाबत आपापली मते प्रकट केली आणि सुरक्षा, संरक्षण आणि सागरी क्षेत्रात चालू असलेल्या द्विपक्षीय सहकार्याचा आढावा घेण्यात आला. उभय पक्षांनी दहशतवाद विरोध, मूलगामीकरण, सायबर सुरक्षा, संरक्षण उद्योग आणि सागरी सुरक्षा विषयी सहकार्य करण्याविषयी सहमती दर्शविली. महत्वपूर्ण खनिजे आणि दुर्मिळ मूलद्रव्य बाबत सहकार्य वाढीच्या पर्यायांबाबत देखील सकारात्मक चर्चा झाली. वार्षिक बैठकीचे आयोजन करुन संवादाला संस्थात्मक स्वरुप देण्यावर सहमती व्यक्त करण्यात आली.

3. भारताचे महामहिम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या निमंत्रणावरुन मलेशियाचे महामहिम पंतप्रधान महामहिम दातो सेरी अन्वर इब्राहिम यांच्या ऑगस्ट 2024 मधील भारत भेटीची फलनिष्पती म्हणून या संवादाकडे पाहिले जाते. या भेटीदरम्यान भारत-मलेशिया द्विपक्षीय संबंध सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारी पर्यंत पोहोचले आहेत आणि दोन्ही नेत्यांनी द्विपक्षीय सुरक्षा सहकार्याला बळकटी देण्याविषयी सहमती व्यक्त केली आहे.

नवी दिल्ली

07 जानेवारी, 2025